# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## सोमवार, दिनांक २२ जुलै, २०१३
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) मंत्री** : **(अ)** "महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा सोळावा वार्षिक अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा अलग लेखा परिक्षण अहवाल क्रमांक : रिपोर्ट/एसएआर/१०-११/एमकेव्हीडीसी/९७ दिनांक १६/८/२०१२ चा अनुपालन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : (अ) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - असल्यास.**

**(ब) म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - असल्यास.**

**चार : लक्षवेधी सूचना- (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

(१) **डॉ. नीलम गोऱ्हे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे महानगरपालिकेने जून २०१० पासून येथील कचरा डेपोत ओपन डंपिंग बंद झाल्याचे घोषित होऊन आज तीन वर्षे पूर्ण हाऊनसुद्धा ओपन डंपिंग बंद झालेले नसणे, १००० टन कचऱ्यांवर रोजच्या रोज प्रक्रिया केली जाणार असून उघड्यावर कचरा कोठेही साचणार नसल्याचे पालिकेने दिलेले आश्वासन फोल ठरणे, या प्रकल्पात अतिशय अयोग्य पद्धतीने लाखो टन कचऱ्यांची उघड्यावरच साठवणूक होत असल्याने या ठिकाणी समांतर कचरा डेपो तयार होणे, कचऱ्याची जीवघेणी दुर्गंधी व झिरपणारे दुर्गंधीयुक्त काळे पाणी (लिचेट) नैसर्गिक ओढे-नाल्यांना जाऊन मिसळत असल्याने सर्व जलस्त्रोत दूषित होणे, यामुळे या भागात बारमाही भीषण पाणीटंचाई निर्माण होणे,

नागरी घनकचरा २००० नुसार सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे हंजर कंपनीकडून वेळोवेळी होत असलेले उल्लंघन, हंजर बायोटेक व्यवस्थापनाकडून आरोग्यास धोका ठरणाऱ्या जीवघेण्या कचऱ्यांचा अशास्त्रीय पद्धतीने साठा करून ठेवणे, या प्रकल्पात काम करणाऱ्या कामगारांचा जीव धोक्यात असून त्यांना कोणतीही सुरक्षा उपकरणे पुरविण्यात आलेली नसणे, पालिका प्रशासनाने तात्काळ ओपन डंपिंग बंद करून हंजर प्रकल्पाची निष्पक्ष चौकशी करून त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्याची तेथील ग्रामस्थांनी केलेली मागणी, कोणतीच कारवाई होत नसल्याने त्यांच्यात निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(२) **डॉ. अपूर्व हिरे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"नाशिक जिल्ह्यात गेल्या ५ वर्षात तब्बल पावणे तीन हजाराहून अधिक महिला बेपत्ता असणे, त्यातील अवघ्या १ हजार ९९१ बेपत्ता महिलांचाच शोध लागला असणे, दिनांक २९ जून, २०१३ रोजी वा त्यासुमारास पिंपळगाव बसवंत येथील अल्पवयीन मुलीवर सामुहिक  बलात्कार झाल्याची घटना घडणे, नाशिक महानगर व परिसरात घरफोड्या, वाहनांची जाळपोळ, दरोडे ह्या गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असणे, शहरातील कायदा व सुव्यवस्थेची ढासळलेली परिस्थिती, या प्रकरणी तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

(३) **श्रीमती अलका देसाई,** सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, विनायक राऊत **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबई येथील शासकीय व पालिका रुग्णालयातील निवासी डॉक्टरांना कामाच्या वेळेपेक्षा अधिक काळ काम करावे लागत असणे, थोडीसुध्दा विश्रांती मिळत नसणे त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येणे, निवासी डॉक्टरांकरिता राहण्यासाठी केवळ १० बाय १० ची खोली देण्यात येऊन त्या खोलीत चार निवासी डॉक्टरांना रहावे लागत असणे, नुकतेच सायन हॉस्पिटलमधील २३ वर्षीय वयाच्या डॉ.समिधा खंदारे यांना टि.बी.ची लागण होऊन त्यांचे निधन होणे, यामुळे निवासी डॉक्टरांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीची करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री. नरेंद्र पाटील वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील मालाड येथील स्पेंसर स्टोअर्स आणि इनॉर्बिट मॉल याठिकाणी ग्रोसरी बोर्डातील नोंदीत माथाडी कामगार तात्पुरते काम करीत असून उक्त कंपन्यांनी माथाडी कामगारांची कामाची मजूरी वसई येथील माथाडी बोर्डाच्या कार्यालयात धनादेशाद्वारे जमा केली असणे, तथापि, सदर कामगारांना केलेल्या कामाची मजूरी अद्यापही न मिळणे, एकूण २४,७०० रुपये ची ही मजूरीची रक्कम ग्रोसरी बोर्डाकडे थकीत राहणे, परिणामी सदर माथाडी कामगारांवर आलेली उपासमारीची पाळी, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्रीमती शोभाताई फडणवीस वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"देशातील सिकलसेल आजाराच्या समूळ उच्चाटनासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानात या आजाराचा समावेश करणे, परंतु विदर्भातील ११ जिल्ह्यांसह १९ जिल्हे प्रभावित करणाऱ्या सिकलसेल आजारावर राज्य शासनाची नियंत्रण संस्थाच स्थापन न होणे, सिकलसेल रुग्णांना केव्हाही व कुठेही उद्‌भवणारा सिकलसेल क्रायसिस टाळण्यासाठी नियमित व ठराविक वेळेत प्रत्येक रुग्णांची आरोग्य तपासणी, जिल्हा रुग्णालय व शासकीय मेडिकल कॉलेजमध्ये डे केअर सेंटर, प्रत्येक रुग्णांला विशेष प्रकारची आरोग्य पुस्तिका, उपचार व आरोग्य तपासणीकरिता एसटी प्रवास भाड्यात सवलत, तसेच, या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी ९० दिवसांच्या आत सिकलसेल नियंत्रण संस्था स्थापन करण्याचे आदेश राज्याच्या लोकायुक्तांनी २० एप्रिल, २०११ रोजी देऊनही त्यांची पूर्तता आजतागायत न होणे, शासनाच्या या उदासिन धोरणामुळे सर्वसामान्य जनतेत पसरलेला असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**पाच : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

## - मध्यंतर -

**सहा : सन २०१३-२०१४ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (पहिला दिवस) -**

**खालील मंत्र्यांच्या संबंधीत विभागांच्या मागण्यांवर चर्चा होईल :-**

**१. उद्योग, बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार मंत्री**

**२. सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) आणि पर्यटन मंत्री**

**३. गृह मंत्री**

**४. वने, पुनर्वसन व मदत कार्य आणि भूकंप पुनर्वसन मंत्री**

**५. कृषी व पणन मंत्री**

**६. ग्रामविकास मंत्री**

**७. सहकार आणि संसदीय कार्य मंत्री**

**८. अन्न व औषध प्रशासन मंत्री**

**९. अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री**

**१०. वैद्यकीय शिक्षण आणि फलोत्पादन मंत्री**

**११. जलसंपदा (कृष्णा खोरे-पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री**

**१२. महसूल व खार जमीन मंत्री**

**१३. कामगार आणि विशेष सहाय्य मंत्री**

**१४. रोजगार हमी योजना आणि जलसंधारण मंत्री**

**सात : शासकीय विधेयके :-**

**(१) विचार पुढे सुरू, खंडश: विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे वि.प.वि.क्रमांक ८ - महाराष्ट्र विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१३.

**क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रामदास कदम, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि.क्रमांक ८ - महाराष्ट्र विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) विचार, खंडश: विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे वि.प.वि.क्रमांक ७ - महाराष्ट्र पशुधन सुधारणा (सुधारणा) विधेयक, २०१३.

**क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रामदास कदम वि.प.स. यांचा**

**प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि.क्रमांक ७ - महाराष्ट्र पशुधन सुधारणा (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि.क्रमांक ७ - महाराष्ट्र पशुधन सुधारणा (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि.क्रमांक ७ - महाराष्ट्र पशुधन सुधारणा (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

आठ : **अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये - (बैठकीच्या शेवटी) -**

(१) **श्रीमती शोभाताई फडणवीस व इतर वि.प.स.पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यामध्ये आजपर्यंत सुमोर ८,२०० बरोजगार सेवा सहकारी संस्था स्थापन करण्यात येणे, परंतु शासकीय स्तरावरील काम या संस्थांना नेमके किती टक्के द्यावे या संदर्भात कोणताही निर्णय घेतला नसल्याने या संस्था कामांच्या प्रतिक्षेत असणे, यासंदर्भात या संस्थेच्या सदस्यांनी राज्य शासनाकडे अनेक वेळा तक्रारी दाखल करुन कोणतीच कार्यवाही केली नसल्याने मुंबई येथील आझाद मैदानात आंदोलन केल्यानंतर दिनांक २ एप्रिल, २०१३ रोजी मा.मुख्यमंत्र्यांच्या दालनात आयोजित केलेली बैठक अचानक रद्द करण्यात येणे, या संस्थांना शासकीय स्तरावरील कामे मिळत नाही पंरतु संस्था स्थापन करण्यासाठी तसेच इतर कामांना हजारो रुपयांचा खर्च या बेरोजगांरांना

करावा लागत असल्यामुळे त्यांच्यावर पडत असलेला आर्थिक भूर्दंड, यामुळे सदस्यांमध्ये निर्माण झालेले नैराश्याचे वातावरण, एका युवकाने आत्मदहन करण्याचा माहे जून, २०१३ च्या सुमारास दिलेला इशारा, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही."

(२) **श्री.जयंत पाटील व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

""सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यामध्ये सन २००९-१० आणि सन २०१०-११ या वित्तीय वर्षाच्या कालावधीत मातीनाला बांध व इतर जलसंधारणाची कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअतंर्गत करण्यात येणे, सदर कामासाठी सेनगाव, लोणार, मंठा, जिंतूर या व इतर जिल्ह्यातील तालुक्यातून मजूर आणून त्यांच्याकडून कुशल व अकुशल प्रकारची कामे करुन घेण्यात येणे, मजूरांच्या नावाने जॉबकार्ड न बनवून त्यांना कामाची मजूरी देखील न देणे, सदर आदिवासी-भटक्या जमातीतील मजूरांनी वैयक्तिकरीत्या व महाराष्ट्र राज्य लालबावटा शेतमजूर युनियनच्या माध्यमातून शासनयंत्रणेकडे पत्रव्यवहार, आंदोलने, निदर्शने इत्यादी माध्यमातून सतत पाठपुरावा करणे, तसेच १२०० पेक्षा जास्त मजूरांनी औरंगाबाद जिल्हा परिषदेसमोर दिनांक २० मार्च, २०१२ पासून बेमुदत उपोषण करणे, या प्रकरणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्यांची समिती घोषित करणे, या प्रकरणी दिनांक ४ जून, २०१२ रोजी अजिंठा पोलीस ठाणे, येथे एफ.आय.आर दाखल करण्यात येणे, त्यामुळे या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २० जुलै, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.